महापारेषण
माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

४०० के.व्ही.ग्र.कें. (संवसु) विभाग, लोणीकंद-२
संभाजी नगर, मु.पो. लोणीकंद, तालुका हवेली,
जिल्हा पुणे ४१२२१६
E.mail :- eelonikand2@gmail.com

संदर्भ : काअ/४०० केव्ही.ग्र.के.विभाग/लोणीकंद-२/मांस/ No 120 / दिनांक :- 02 MAY 2022

शिकाऊ उमेदवार कायदा १९६१ अंतरर्गत सत्र २०२२-२०२३ करीता प्रतिक्षा यादीतून निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी.

१.औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री (Electrician) व्यवसाय अभ्यासक्रमातून उत्तीर्ण पात्र उमेदवारांकडून ४०० के.व्ही.ग्र.कें. (संवसु) विभाग, लोणीकंद-२ करीता ०३ जागांकरीता शिकाऊ उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.१५.०९.२०२१ पर्यंत होती.

२.वैध अर्ज असलेल्या पात्र उमेदवारांची त्यांच्या एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री(Electrician) एकत्रित टक्केवारीच्या सरासरीच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली आहे. उमेदवारांच्या अर्जामध्ये असलेल्या माहितीनुसार प्रवर्गनिहाय सामाजिक आरक्षणाच्या आधारे गुणवत्तेनुसार तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे.

३.ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांची एकत्रित गुणांची टक्केवारी समान आहे, अशा उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून वयाच्या जेष्ठतेनुसार क्रमवारी लावण्यात आली आले.

४.तात्पुरती निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारीकरीता उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. तात्पुरती निवड यादी हि उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, व इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून आहे. त्यामुळे जर उमेदवार शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होण्यासाठीची पात्रता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटि व शर्तीचा भंग होत असल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५.तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळेस शैक्षणिक पात्रतेसंबंधी गुणपत्रिका/प्रमाणपत्रे, सामाजिक आरक्षणाकरीता ज्या प्रवर्गातून अर्ज सादर केला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, ज्या प्रवर्गाकरीता प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र) आवश्यक आहे,त्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमिलेअर) दि.३१.०३.२०२२ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांना EWS आर्थिक दुर्बल घटक बाबतचे प्रमाणपत्र,अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडलेचा दाखला, इत्यादी मूळ प्रमाणपत्रे व सर्व कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित ३ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. जर उमेदवार कागदपत्र पडताळणीच्या वेळेस वरीलपैकी मुळ प्रमाणपत्रे दर्शविण्यास/सादर करण्यास/दाखविण्यास असमर्थ ठरल्यास किंवा मूळ प्रमाणपत्र व अर्जासह जोडलेल्या प्रमाणपत्रांमध्ये तफावत आढळल्यास संबंधीत उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

६.तात्पुरत्या निवड झालेल्या उमेदवारांपैकी कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्याने, कागदपत्र पडताळणी करीता विहित मुदतीत हजर न झाल्याने, अथवा कागदपत्र पडताळणी पात्र ठरुनही दिलेल्या ठिकाणी विहित मुदतीत रुजू न झाल्याने रिक्त असलेल्या जागांसाकरीता गुणवत्ता यादीतील क्रमवारीने प्रतिक्षा यादी आपोआपच कार्यान्वित

होवून खुल्या तथा राखीव जागांकरीता प्रवर्गनिहाय उमेदवारांची निवड तथा प्रतिक्षा यादी लावण्याचा अधिकार ४०० के.व्ही.ग्र.कें. (संवसु) विभाग, लोणीकंद-२ राखून ठेवत आहे.

७.तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे चुका सुधारित करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार ४०० के.व्ही.ग्र.कें. (संवसु) विभाग, लोणीकंद-२ राखून ठेवत आहे.

८.निवड न झालेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचे फोन,ई-मेल, किंवा पत्रव्यवहार ४०० के.व्ही.ग्र.कें. (संवसु) विभाग, लोणीकंद-२ कार्यालयाकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही फोन, ई-मेल, किंवा पत्रव्यवहारांची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९.प्रतिक्षा यादीतुन निवड झालेल्या उमेदवारांनी दि.१०.०५.२०२२ पर्यंत 'कार्यकारी अभियंता, ४०० के.व्ही. ग्र.कें. (संवसु) विभाग, लोणीकंद-२ संभाजीनगर, मु.पो. लोणीकंद, तालुका हवेली जिल्हा. पुणे. या पत्त्यावर कार्यालयीन दिवशी, कार्यालयीन वेळेत मुद्दा क्र.५ मध्ये दर्शविलेप्रमाने मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे (सर्व कागदपत्रांच्या छायांकित, स्वयं साक्षांकित ३ प्रतीसह) पडताळणीकरीता हजर रहावे. दि.१०.०५.२०२२ नंतर कागदपत्रे पडताळणीकरीता येणाऱ्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

१०.कागदपत्र पडताळणीकरीता येणाऱ्या उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवासखर्च किंवा इतर खर्च दिला जाणार नाही. सर्व उमेदवारांनी स्वखर्चाने कागदपत्रे पडताळणीकरीता उपरोक्त दिलेल्या विहित वेळेत व कार्यालयात उपस्थित राहावे.

Ramteke

(संजयकुमार रामटेके)
कार्यकारी अभियंता
४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग,
लोणीकंद २

Provisional Select List OPEN Category

Sr. No.	Name of Candidate	Category	Remarks
1	Krushna Madhav Rajmore	OBC	Select against OPEN

Provisional Select List OBC Category

Sr. No.	Name of Candidate	Category	Remarks
1	Pradumn Bhagwan Bhoyar	OBC	

Provisional Select List SC Category

Sr. No.	Name of Candidate	Category	Remarks
1	Pandurang Balaji Borkar	SC	

Ex. Engineer
M.S.E.T.Co Ltd
400 Kv R.S. Dn. Lonikand II